सकाळ :

# व्ही. टी. पाटील यांना डी. लिट्.

## शिवाजी विद्यापीठाचा निर्णय

**कोल्हापूर, ता. ७- ताराराणी व मौनी विद्यापीठाचे संस्थापक ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ व्ही. टी. पाटील यांना डि. लिट्. ही मानद पदवी देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. 'मला मिळालेली डि. लिट्. पदवी म्हणजे ताराराणी विद्यापीठ या 'शैक्षणिक विश्वाचा गौरव आहे,' असे मनोगत श्री. व्ही. टी. पाटील यांनी आज 'सकाळ'शी बोलताना व्यक्त केले.**



श्री. व्ही. टी. पाटील यांना डि. लिट्. पदवी देण्याचा निर्णय शिवाजी विद्यापीठाच्या कार्यकारिणीने आज घेतला. डिसेंबर महिन्यात होणाऱ्या पदवीदान समारंभात त्यांना ही पदवी प्रदान करण्यात येणार आहे.

श्री. व्ही. टी. पाटील यांना डि. लिट्. पदवी देण्याबाबत विद्यापीठ कार्यकारिणीने कुलपतींना शिफारस केली होती. य शिफारशीस कुलपतींनी मान्यता दिली व आज शिवाजी विद्यापीठ कार्यकारिणीने या संदर्भात ठराव मंजूर केला. या ठरावास आता विद्यापीठ विधीसभेची औपचारिक मान्यता घेण्यात येईल. **(पान २ वर)**

# ताराराणी विद्यापीठाचा गौरव

**(पान १ वरून)**

महाराणी ताराराणीसारख्या एका शूर, लढवय्या स्त्रीचे चिरंतन स्मारक शिक्षणाच्या कार्यातून उभे राहावे, हा आपल्या शैक्षणिक सेवेचा हेतू होता, असे श्री. पाटील यांनी सांगितले. ते म्हणाले, '१९४५ साली ताराराणी विद्यामंदिर या इंग्रजी माध्यमाच्या शाळेची सुरवात केली. २२ मुली या शाळेत होत्या. त्यानंतर हळूहळू या संस्थेचा विस्तार होत गेला. आज पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, बी. एड., कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अशा विविध विभागात साडेचार हजार मुली शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रात एक आदर्श शिक्षण संस्था म्हणून या संस्थेचा गौरव होतो आहे.'

महाराणी ताराराणीच्या नावाने स्वतंत्र महिला विद्यापीठाची स्थापना हे आपले स्वप्न असल्याचे सांगून श्री. पाटील म्हणाले, 'या विद्यापीठाद्वारे आदर्श, कर्तृत्ववान महिला घडविण्याचा या विद्यापीठाचा मानस आहे. महिलांना नेमबाजी, पोहणे, घोडेस्वारी व इतर खेळांचे शिक्षण देणे, हा देखील या विद्यापीठ स्थापनेमागचा उद्देश आहे.'

श्री. व्ही. टी. पाटील यांनी शैक्षणिक क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ते १९६२ ते १९६७ या काळात लोकसभा सदस्य होते. तसेच त्यांनी कोल्हापूरचे नगराध्यक्ष, लोकल बोर्ड अध्यक्ष, पन्हाळा हील स्टेशन नगराध्यक्ष, देवस्थान समितीचे अध्यक्ष, शाहू मार्केट यार्ड अध्यक्ष ही पदे भूषविली आहेत. ते दूधगंगा-वेदगंगा सहकारी साखर कारखाना व शेतकरी सहकारी संघ, मराठा बँक या संस्थांचे संस्थापक सदस्य आहेत.

**कोल्हापूर, बुधवार, ८ नोव्हेंबर १९८९**